# संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन -२०१९
## धुळे जिल्हा पोलीस शिपाई भरती सन-२०१९

पोलीस अधीक्षक धुळे

जाहिरात क्रमांक -१ ठिकाण -पोलीस मुख्यालय धुळे दिनांक - २२/०८/२०१९

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दि.१८.०१.२०१९ व दि.०४.०७.२०१९ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणांनुसार पोलीस अधिक्षक धुळे यांच्या आस्थापनेवर सन-२०१९ मध्ये जिल्हा पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी (१६) पदे भरण्यासाठी जिल्हा पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

**धुळे जिल्हा पोलीस शिपाई :-**

| | अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | एसई बीसी | ई डब्ल्यू एस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | ०१ | -- | -- | ०३ | ०२ | -- | -- | ०४ | ०३ | ०३ | -- | १६ |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०१ | -- | -- | ०२ | ०१ | -- | -- | ०२ | ०२ | ०२ | -- | १० |
| महिला(३०%) | -- | -- | -- | ०१ | ०१ | -- | -- | ०१ | ०१ | ०१ | -- | ०५ |
| खेळाडू (५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| प्रकल्पग्रस्त(५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| भुकंपग्रस्त(२%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| माजी सैनिक(१५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ |
| अंशकालीन पदवीधर (५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| पोलीस पाल्य (३%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| गृहरक्षक दल (५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अनाथ (१%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| एकुण | ०१ | -- | -- | ०३ | ०२ | -- | -- | ०४ | ०३ | ०३ | -- | १६ |

D:JBJ-SC-1/Police Bharti-2019/Police Bharti Advertisemnt-19

Scanned by CamScanner

अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१९ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यांत आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागिल अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यांत आलेली आहेत.

ब) अंतिम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यांत येईल.सदर निवड यादीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल.निवड यादीमध्ये उमेदवारांच्या नावाचा समावेश झाला म्हणुन नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वाच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रं.२८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतीम निर्णयाच्या आदेशाच्या अधीन राहून व मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी जनहित याचिका क्र.१७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.२७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णया विरुध्द मा.सवोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो. व त्याची माहिती वेळोवेळी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

ड) या कार्यालयाच्या आस्थापनेवर बॅण्ड पथकातील पोलीस शिपायांची रिक्त पदे भरतीसाठी उपलब्ध नाहीत.

इ) कारागृह विभागात बॅन्डस्मन हे पद मंजुर नाही.

३) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह शिपाई पदासाठी **पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११** वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणासह (शा.नि.क्र.जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/तुरुंग-१,दि. १५/०१/२०१६ अन्वये),लागु आहेत. सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणांसह www.mahapolice.gov.in **या संकेतस्थळावर (Home Page) वर व www.sp.dhulepolice.gov.in वर उपलब्ध असुन ते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागु राहतील.**

**महत्वाची टिप :-**

जिल्हा पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवारांनी त्या बाबतची माहिती अॅन्टी करप्शन ब्युरो धुळे यांना दुरध्वनी क्रमांक ०२५६२/२३४०२० वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच या संदर्भात उमेदवार पोलीस अधिक्षक या कार्यालयातील वरिष्ठ अधिका-यांशी किंवा अध्यक्ष,पोलीस भरती समिती-२०१९ तथा अपर पोलीस अधिक्षक / पोलीस उप अधिक्षक (मुख्या) धुळे यांच्याशी संपर्क साधून तक्रार करु शकतील. तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२०२३६३७ या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अक्र. | संस्था/कार्यालयाचे नांव | दुरध्वनी/मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | पोलीस अधिक्षक कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | ०२५६२-२८८२११<br>०२५६२- २८८२१२ |

(विश्वास पांढरे)
पोलीस अधिक्षक धुळे.

D:JBJ-SC-1/Police Bharti-2019/Police Bharti Advertisemnt-19

Scanned by CamScanner